# प्रकरण – 9 (मॅन्युअल - 8)

## निर्णय घेण्याच्या प्रकियेत वापरली जाणारी पध्दत-

**9.1** विविध बाबतीत निर्णय घेण्यासाठी कोणती पध्दत वापरली जाते (सचिवांचे मॅन्युअल आणि बिझनेस मॅन्युअल नियम आणि इतर नियम/नियमावली इत्यादीचे संदर्भ वापरु शकतात).

1) **<u>विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि 33(9) खाली महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या पुनर्विकासाच्या बाबतीत</u>** –

प्रथम सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) हयांच्या कार्यालयात प्रस्ताव सादर केला जातो. जे धोरणाप्रमाणे प्रस्तावाची छाननी केल्यानंतर जोडपत्र-दोन तयार करतात आणि हया कार्यालयात कागदपत्रे पाठविली जातात. हे कार्यालय प्रस्तावाची तांत्रिकदृटया व आर्थिकदृष्टया छाननी करतात आणि खाते प्रमुख असलेल्या अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सभेसमोर सादर करतात. मान्यता मिळाल्यानंतर हया खात्याकडून मसुदापत्र सादर केले जाते आणि प्रस्तावाला सुधार समिती/महानगरपालिकेची मान्यता आवश्यक आहे.

2) **<u>निरनिराळया आरक्षणांच्या विकासाबाबत</u>**

हया खात्यावर आरक्षणाच्या वाटपाकरिता निरनिराळी मार्गदर्शक तत्वे बनविण्याची जबाबदारी आहे. उदा. विकास नियंत्रण नियमावली (9) चा परिणाम म्हणून बाजार, महानगरपालिका हॉस्पिटल, दवाखाने, कल्याण केंद्र, वाचनालय महानगरपालिकेकडे येतात आणि खाजगी पक्षाच्या सहभागामधून आरक्षणाच्या विकासासाठी निविदा मागविणे ही मार्गदर्शक तत्वे वापर करण्याच्या निरनिराळया खात्यांना विभागीय कार्यालयातील सार्वजनिक जाहिरात किंवा सार्वजनिक प्रदर्शन सारख्या त्याच्या अखत्यारीत असलेल्या बांधलेल्या सुखसोयीच्या वाटणीबाबत पारदर्शक पध्दत म्हणून ही मार्गदर्शक तत्वे उपयोगी आहेत. सर्व प्रकरणाबाबत प्रस्ताव उप प्रमुख अभियंता (खा.प्रा.कक्ष) खात्याकडून किंवा वापर करणा-या खात्याकडून मूल्यांकन समितीकडे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अणि महानगरपालिका

आयुक्तांकडे जातात. त्यानंतर मसुदापत्र सुधार समिती/महानगरपालिका हयांच्याकडे सादर करण्यात येते आणि महानगरपालिकेकडून अंतिम मंजूरी देण्यात येते.

9.2 कोणत्याही विशेष विषयावर निर्णय घेण्यासाठी निर्धारीत नियम आणि पध्दती कोणत्या आहेत किंवा निर्णय घेण्यासाठी कोणकोणत्या स्तरावर विचार केला जातो

3) **<u>विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि 33(9) खाली महानगरपालिका भाडेकरु मालमत्तेच्या पुनर्विकासांबाबत</u>** –

विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि 33(9) ची धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन हया खात्याकडून समिती अहवाल तयार केला जातो. नंतर कामाचे मुख्य असलेल्या अतिरिक्त मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या तांत्रिक समितीमध्ये सदर विषयाची चर्चा केली जाते. समितीचे इतर सदस्य सह आयुक्त (सुधार), संचालक (अभि.सेवा व प्रकल्प), प्रमुख अभियंता (विकास नियोजन), उप प्रमुख अभियंता (खा.प्रा.कक्ष), कायदा अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) हे आहेत. नंतर प्रकल्पांशी संबंधित सवलती लक्षात घेऊन एकत्रित निर्णय घेतला जातो. नंतर महानगरपालिका आयुक्तांची मंजुरी घेतली जाते. समितीच्या सभेमध्ये जो निर्णय घेतला जातो त्याप्रमाणे सुधार समिती/महानगरपालिका हयांच्या मंजुरीकरीता मसुदापत्र सादर केले जाते.

**9.3 लोकांना निर्णय कळविण्यासाठी कोणत्या प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे?**

1) तांत्रिक समितीचा निर्णय वास्तुशास्त्रज्ञ विकासक, सोसायटीचे चेअरमन हयांना कळवियात येतो. त्यामुळे ते इतर सदस्यांना कळवू शकतात. भाडेकरुसुध्दा निर्णयाबाबत हया खात्याकडे संपर्क साधू शकतात.

2) धोरणात्मक मार्गदर्शक तत्वांच्या बाबतीत महानगरपालिकेची मंजुरी घेतली जाते आणि जर आवश्यकता असेल तर महाराष्ट्र शासनाच्या शहर विकास खात्याची सुध्दा मंजुरी घेतली जाते. महानगरपालिकेच्या खात्यामध्ये धोरणे प्रसारीत केली जातात. मोठया प्रमाणात लोकांना निर्णय कळविण्याची पध्दत नाही. धोरणाबद्दल जे लोक विचारणा करतात त्यांना ते सहजरित्या उपलब्ध करुन दिले जातात.

**9.4 निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये विविध स्तरातील कोणत्या अधिका-यांचे निर्णय विचारात घेतले जातात?**

सर्व प्रकरणांमध्ये विविध स्तरातील ज्या अधिका-यांचे निर्णय घेतले जातात ते म्हणजे महानगरपालिका आयुक्त, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, सह आयुक्त, संचालक (अभि. सेवा व प्रकल्प), प्रमुख अभियंता (विकास नियोजन), कायदा अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) इत्यादी.

## 9.5 अंतिम निर्णय घेण्यासाठी अंतिम प्राधिकरण अधिकारी कोण आहेत?

1) उतारा 9.4 मध्ये नमूद केलेल्या सदस्यांचा समावेश असलेल्या तांत्रिक समितीकडून अंतिम निर्णय घेतला जातो.
2) आरक्षणाच्या विकासाच्या बाबतीत लागू असलेल्या खात्याचे प्रमुख असलेल्या अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांकडून अंतिम निर्णय घेतला जातो.

## 9.6 कृपया सार्वजनिक प्राधिकरणाकडून निर्णय घेण्यात येतो अशा महत्वाच्या बाबतीत खालील नमुन्यामध्ये वेगळी माहिती सादर करावी:-

| | |
|---|---|
| विषय ज्यावर निर्णय घ्यावयाचा आहे | 1)विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि 33(9) खाली महानगरपालिका मालमत्तेचा पुनर्विकास.<br>2)निरनिराळया महानगरपालिकेच्या आरक्षणाचा विकास आणि धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे. |

| | |
|---|---|
| मार्गदर्शक तत्वे/निर्देशन, असल्यास, | 1)विकास नियंत्रण नियमावली 33(7) आणि विकास नियंत्रण नियमावली 33(9) करिता मार्गदर्शक तत्वे राज्य शासनाकडून मान्यता<br>2)मार्गदर्शक तत्वे उदा. बाजार महापालिका |

| | |
|---|---|
| | हॉस्पीटल, दवाखाने, कल्याण केद्र, वाचनालय, प्रसूतीगृह जागेचे आरक्षण इत्यादी. |
| | |
| कार्याची पध्दत | वरील उता-यांत नमूद केल्याप्रमाणे |
| | |
| संबंधित अधिका-यांचे हुद्दे | उतारा 9.4 मध्ये नमूद केल्याप्रमाणे. |
| | |
| जर निर्णयामुळे समाधान झाले नसेल तर, कोठे आणि कसे अपील करावयाचे | महानगरपालिका आयुक्तांकडे अपील करावयाचे |